महाराष्ट्रातील सैनिकी शाळेतील मागासवर्गीय
विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना
निर्वाह भत्ता व उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- इबीसी-२००३/प्र.क्र.१८४/मावक २**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.**
**दिनांक : १७ सप्टेंबर, २००३**

18 SEP 2003

**वाचा :-** १) शासन निर्णय, समाज कल्याण व क्रीडा विभाग क्रमांक :इबीसी-१०७७/२६२५४/- डेस्क-५, दिनांक १/८/१९७८
२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक : इबीसी-१०९१/१२८७/प्र.क्र.१३/मावक-२, दि.३०/४/९४
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इसैशा-१०९५/(२१७८/९५)/माशि-७, दिनांक २९/९/९५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इसैशा-२००१/(१८५/०१)/माशि-७, दिनांक ५/७/२००२

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता निर्वाह भत्ता मंजूर करण्याची योजना सन १९७६-७७ पासून राबविण्यात येत आहे. तसेच वरील संदर्भीय क्र.३ मधील शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणा-या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो. ज्या पालकांचे उत्पन्न रु.१५००/- दरमहा च्या कमाल मर्यादेत आहे, अशा पालकांच्या मुलांना वरील योजनेचा लाभ देण्यात येतो. विद्यार्थ्यांना देण्यात यावयाच्या निर्वाह भत्यात वाढ करणे तसेच पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता या शाळांमधून प्रचलित दराने आकारण्यात येणाऱ्या संपूर्ण खर्चाची रक्कम तसेच शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणा-या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाकरीता शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्धारित केलेल्या वार्षिक शुल्काची रक्कम रु.१५,०००/- संबंधित संस्थेस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरीता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६५,२९०/- च्या कमाल मर्यादेत आहे. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

३. वर परिच्छेद १ अन्वये योजनेचा लाभ घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी या व्यतिरिक्त इतर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क व इतर शुल्क मंजूर करणे या योजनांचा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाहीत.

४. याबाबत होणारा खर्च " मागणी क्रमांक एन-४, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१, अनुसूचित जातीचे कल्याण, २७७, शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (विघयो) राज्य योजनांतर्गत योजना (०४) (१२) सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना परिरक्षण भत्ता (२२२५ ०४५ ९) " या अर्थशिर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३३/०३/ व्यय-१५, दिनांक २३/६/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

( नं. मा. शिलवंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, वित्त विभाग.
सचिव, शालेय शिक्षण विभाग.
सर्व मंत्रालयीन विभाग.-
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी

ISSUED
18 SEP 2003